# लंडनची बातमीपत्रे

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**लंडनची बातमीपत्रे : विनायक दामोदर सावरकर**

© **हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# लंडनची बातमीपत्रे

# लंडनची बातमीपत्रे

## १. हिंदुस्थाना ! तुला पचेल ते तू खा !

गेल्या आठवड्यात लंडन शहरी अनेक महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. दि. २० रोजी अिंडियन बजेटवर वादविवाद होणार होता. त्या वादविवादात आपल्या देशाच्या वतीने भिक्षा मागत फिरत असलेल्या प्रतिनिधीचा सर्व जीव गुंतून राहिला होता. बजेटच्या दिवशी सकाळी 'डेली न्यूज' अित्यादी पत्रात भिक्षांदेहीची आरोळी ठोकली गेली होती. My nation stands expectant म्हणून ना. गोखले यांनी धडधडीत असत्य विधान केले. ना. गोखले यांना आशा असेल. परंतु ती हिंदुस्थानातील लोकांची आशा नव्हती ! वेडरबर्न व सर हेन्री कॉटन यांच्या टुरटुरीत ज्यांना हिंदुस्थान देशाची खरी कळकळ दिसते त्यांना हिंदुस्थानामधल्या किती पैसा यंदा लुटला व पुढच्या साली किती व कसा लुटावयाचा हे ठरविण्यासाठी होणाऱ्या बजेटावरील वादविवादात अभागी हिंदुस्थानची अुन्नती दिसावी हे ठिकच आहे. शेवटी काय झाले? कोणाची आशा सफल झाली? लिबरल मोर्लेनी काय दिले? आज एक शतकभर भिक्षा मागत असता परवाच्या अिष्ट घटिकेला मोर्लेच्या त्या अत्यंत कुटिल भाषणाशिवाय झोळीत काय पडले? राष्ट्रीय सभेचे पुढारी opium eaters अफू खाणारे आहेत हीच पदवी त्यांना मिळाली ना? भ्रमिष्ट लोकांनो ! तुम्ही केव्हा शुद्धीवर येणार ? हेन्री कॉटनच्या चर्चेवरील थर्मामीटरप्रमाणे कडक किंवा सौम्य भाषा वापरून देशाला Self-Government मिळविण्याच्या तुमच्या प्रयत्नांचा सर्व राष्ट्र तिरस्कार करीत आहे हे तुम्हाला केव्हा कळणार? व जगातील सर्व स्वतंत्र व मानधन पुरुषांत तुमची छी थू होत आहे याची तुम्हाला लाज केव्हा वाटणार?

इकडे पार्लमेंट सभेत हा तमाशा संपतो न संपतो तो चंडास हॉलकडे काही वेगळाच प्रकार होअु पाहत होता. सोशल डेमोक्रॅटिक फेडरेशन नावाच्या प्रसिद्ध संस्थेची व्याख्यानमालिका सुरू झालेली आहे. तीमध्ये दि. २२ रोजी देशबंधु पारेख, बॅरिस्टर ॲट लॉ यांचे 'The Recent Persecution in Bengal' या विषयावर व्याख्यान झाले. दे. पारेख हे इंग्लंडमध्येच प्रॅक्टिस करीत असतात. ते इंडियन होमरूल सोसायटीचे अुपाध्यक्ष आहेत. त्यांचे भाषण सुमारे तासभर चालले होते. त्यात त्यांनी अेकदा बंगाली अित्यादी विद्यार्थ्यांच्या जुलमाची काही अुदाहरणे देअून असे विचारले की, 'पारतंत्र्याने जेथील लोक नाडले आहेत व कायदेशीर रीतीने जाण्याचे मार्ग जेथे बंद झालेले आहेत अशा माझ्या राष्ट्राने आता काय करावे?' अशा आशयाचे अुद्गार काढताच अेक सभासद अेकदम ओरडला 'काय करावे?' हा प्रश्न ज्यांनी विचारला ते सोशल डेमोक्रॅटिक पुढाऱ्यांपैकी अेक आहेत. पुढे व्याख्यात्याचे जोरदार व स्वतंत्र विचाराचे भाषण झाल्यावर प्रश्नोत्तरास प्रारंभ झाला. अेका आयरिश तरुणाने – तो आयरिश असावा असा माझा अजमास आहे – हिंदुस्थानने अशा वेळी आयरिश नॅशनॅलिस्ट ह्या स्वावलंबी पक्षाप्रमाणे ब्रिटिशांना कोणतेही साह्य करू नये व आयर्लंडने व हिंदुस्थानने एकदमच एकमेकांच्या साह्याने उभयतांचे कल्याण करून घ्यावे असे सुचविले. नंतर मिस्टर हार्वे नावाच्या अेका पुढाऱ्याचे भाषण झाले. त्याचा सारांश असा होता की, जेथे परवशतेचा कळस झाला आहे व कायदा सत्ताधारी लोकांच्या तरवारीनेच चिरला गेला आहे, तेथे राष्ट्रचैतन्य राखावयाचे असल्यास दोनच अुपाय असतात. एक 'जनरल पॅसिव्ह' रेझिस्टन्स' किंवा दुसरा 'गुप्त मंडळ्या.' 'Passive Resistance' हा अप्रत्यक्ष प्रतिकार आहे. परंतु गुलामगिरीत पडलेल्या राष्ट्राची हा अप्रत्यक्ष प्रतिकार जालीम रीतीने अमलात आणण्याअितकी तयारी बहुधा झालेली नसते. कोणीही सरकारला मदत न करण्याची बुद्धी अुत्पन्न होण्यास व त्याप्रमाणे सर्वांकडून वर्तन घडण्यास समाज राजकीय शिक्षणाने फारच सुसंस्कृत केलेला पाहिजे व ते राजकीय शिक्षण परक्यांच्या करड्या सत्तेखाली स्पष्ट रीतीने देणे अशक्य झालेले असते. म्हणून प्रथम दुसरा अुपाय योजला जातो व तो 'Secret Societies' गुप्त मंडळ्या हा होय. या गुप्त मंडळ्यांनी स्वदेशप्रेम अुत्पन्न करावे व रचनाकौशल्याने प्रचंड संघ अुभारावे. रशियामध्ये याचे ताजे अुदाहरण घडत आहे व रशियाचे स्वातंत्र्य आता दूर नाही. हे सर्व कृत्य गुप्त मंडळ्यांचे आहे इ.इ. त्यानंतर एका बाअीचे भाषण



झाले. त्या बाअीची शांत व उदात्त मुद्रा व त्यांचे मानसिक शास्त्राच्या आधाराने झालेले भाषण यावरून त्या फारच सुशिक्षित असाव्या. त्या आयरिश असाव्या असे दिसते. त्यांनी रशियाची व हिंदुस्थानची तुलना केली व जेथे जेथे मानव जात परवशतेत खितपत असेल तेथे तेथे माझे अंत:करण गुंतले आहे व जगतात कोणीही परतंत्र नाही अशी स्थिती येअितोपर्यंत मला चैन पडावयाचे नाही असे सांगितले. अितक्यात अेक साहेब उठले व त्यांनी दे. पारेख यांना 'लेबर पार्टीला' पैशाची मदत हिंदुस्थानने करावी म्हणजे लेबर पार्टी येथे अधिकारावर आली की हिंदुस्थान वर येअील म्हणून सांगितले. यांना आजपर्यंत हिंदुस्थानने केलेली 'पैशाची मदत' पुरेशी झाली नाही. दे. पारेख यांनी व सोशॅलिस्ट लोकांनी त्या गरीब साहेबाची फारच टर अुडविली, अध्यक्षांनीही 'हिंदुस्थानातील लोकांनी हिंदुस्थानातच काम केले पाहिजे, अमका पक्ष अिंग्लंडमध्ये अधिकारावर येईल म्हणून पैसे धाडून व त्यांना हिंदुस्थानच्या स्थितीची माहिती देण्यासाठी प्रतिनिधी धाडून काही अेक व्हावयाचे नाही' असे सांगितले व मोर्लेनी 'हिंदुस्थानातील लोकांस लेखनस्वातंत्र्य व वाक्स्वातंत्र्य आहे असे पार्लमेंट सभेत विधान करावे व बंगाल्यात ही स्थिती ठेवावी हे फार लांछनास्पद आहे' असे प्रतिपादिले.

अशा रीतीने हिंदुस्थानच्या रोगावर दोन औषधे मिळाली आहेत. House of Commons मधल्या दवाखान्यात देशभक्त गोखल्यांना अेका मोर्ले नावाच्या डॉक्टरांनी अेक बाटली दिली व चंडास हॉलमधल्या आरोग्यभुवनात मि. हार्वे या नावाच्या भिषग्वर्याने दे. पारेख यांना अेक औषधी दिली.

**हिंदुस्थाना ! तुला पचेल ते तू खा !**

– दि. १७ ऑगस्ट १९०६

✦✦✦

## २. राष्ट्रीय तरुण सेना

लंडन : 'बडे घर व पोकळ वासा' अशी ब्रिटिश साम्राज्याची स्थिती झालेली आहे. या साम्राज्याच्या बाह्य अंगाला पाहूनच जे चकित होतात त्यांना हे साम्राज्य आतून किती पोखरलेले आहे याची कल्पना देखील नसते. हिंदुस्थानसारख्या सहासात हजार कोसांवरील जित झालेल्या देशात अिंग्लिशांचे केवढे भय वाटते !

हिंदुस्थानातील तीस कोटी लोकांनाच काय, परंतु सर्व जगाला ताब्यात ठेवील अशी अिंग्लंडची शक्ती आहे, ही सर्वसाधारण समजूत असते. अिंग्लंड म्हणजेच नंदनवन आहे, का कामधेनू आहे, का स्वर्ग आहे, असे वाटत असते. परंतु अिकडे प्रत्यक्ष स्थिती पाहिली म्हणजे काय आढळते आहे? पार्लमेंटच्या जागा पैशाने विकल्या जात आहेत. खायला मिळत नाही म्हणून हजारो लोक अुपाशी मरत आहेत. काम नाही म्हणून अुडाणटप्पूंचे दंगे होत आहेत. लाच खाणे, खोटे बोलणे, रानटीपणाची कामे करणे, ही कृत्ये अितकी सर्वसाधारण आहेत की, त्यांची चौकशी देखील होत नाही. प्रत्येक सार्वजनिक चव्हाट्यावर व जागेमध्ये, प्रत्येक अैतिहासिक जागी व प्रदर्शनस्थलामध्ये मनुष्य शिरू लागला की अेक भली मोठी पाटी टांगलेली असते. तिच्यावर 'Beware of the pickpockets' 'खिसेकातरूंना जपा' म्हणून अक्षरे लिहिलेली असतात. ही अक्षरे काय दाखवितात? अिंग्लंडमध्ये इतके खिसेकातरू आहेत की, प्रत्येक जागेवर पोलिसबरोबर त्यांचाही पहारा बसलेला आहे. परंतु अिंग्लंडमध्ये कोण खिसेकातरू नाही? 'Beware of the Pickpockets' ही पाटी अिंग्लंडपुरतीच लावलेली नसती व जर परमेश्वराने ती प्रत्येक देशाच्या दारावर लावली असती, तर किती बरे झाले असते ! कारण अिंग्रजी खिसेकातरूंची भीती ही अिंग्लंड देशातच फक्त नसून ती जगावरील सर्व देशात शिरलेली आहे. अिंग्लिश लोक व्यावहारिक शास्त्रात पटाईत झालेले आहेत याचे हे अेक प्रत्यंतरच आहे. कारण या खिसे कातरण्याच्या धंद्यात देखील त्यांनी अर्थशास्त्राच्या तत्त्वाप्रमाणेच काम चालविले आहे. ते तत्त्वाला सोडून कधीही वागत नसतात ! त्यांनी या खिसेकातरूपणाचे धंद्यात श्रमविभाग केलेला आहे. खिसे दोन प्रकारचे असतात. व्यक्तीचा खिसा व राष्ट्राचा खिसा. पैकी व्यक्तीचे खिसे कातरण्यासाठी अिंग्लंडमध्ये लोक किती अिमाने अितबारे खटपट करीत असतात हे प्रत्येक स्थली असलेल्या त्यांच्यावरील जाहिरातीवरून दिसून येअील व राष्ट्राचे खिसे कापण्यात तर अिंग्लिश किती पटाअीत आहेत हे हिंदुस्थानातील लोकास सांगत बसणे म्हणजे अिंग्लिशांच्या या सद्गुणाची 'नेटिव्हांना' काहीच माहिती नाही असे म्हणण्यासारखे आहे. झुलू लोकांशी झालेल्या लढाअीत अिंग्रजांनी पशुहूनही रानटीपणा दाखविला अशी त्यांचीच पत्रे ओरड करीत आहेत ! अेक झुलूबाअी आपल्या मुलांस घेअुन अुभी होती व त्यांची समजूत घालीत होती. अितक्यात एक शूर अिंग्रजी शिपाअी आला



व त्याने म्हटले, 'बाअी, तू नको त्रास घेऊ ! मी तुझ्या मुलाची समजूत घालतो' व असे म्हणून त्याने त्या मुलाला गोळी घातली. शेकडो अधम कृत्यांपैकी मी हे अुदारणार्थ देत आहे. ही कृत्ये अिंग्रज शिपाअीच आता अिंग्रजी पत्रांना कळवीत आहेत. बोअर वॉरमध्ये बोअर लोकांना शस्त्र अिंग्लंडमधून मिळाली अशी गुणगुण होती. परंतु आता झुलुवॉरमध्येही त्या सद्गुणात अिंग्रजांची बरीच प्रगती झालेली आहे. झुलूना बंदुकांचा पुरवठा अिंग्लंडमधून झाला अितकेच नव्हे, तर लष्करी कमिशनच्या चौकशीवरून असे सिद्ध झाले आहे की, कोट्यावधी रूपयांची अफरातफर होअुन मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या सह्याने लाचलुचपतही राजरोसपणे चालू होती. अशा हजारो गोष्टीवरून अिंग्लंडमधील अंतर्गत स्थिती किती कुजत आली आहे याचा अंदाज करता येअील. परंतु बाहेरचा भपका पाहून गरीब लोक हताश होऊन जातात व त्यांना अिंग्लंड म्हणजे अेक अजरामर, मोठा थोरला राक्षस आहे असे वाटू लागते. परंतु तसे काही अेक नाही. अिंग्लंडचे मन कुजले आहे. त्यांच्यातील थोर सद्गुण पूर्वी कधीकाळी असतील तर ते नष्ट झालेले आहेत. साम्राज्याच्या अुतरत्या काळात जी चिन्हे व्हावयाची ती सर्व दृग्गोचर होत आहेत व ही त्यांना स्वत:लाच जितकी कळत आहेत तितकी अितर कोणालाही कळत नसतील. आपल्या हिंदुस्थानात अशी समजूत आहे की, अिंग्लंडचे मन नीतिभ्रष्ट झालेले आहे तथापि त्यांचे सामर्थ्य मात्र फारच मोठे आहे, ज्या राष्ट्राला अेखादी मोडकी तरवार किंवा फुटकी नाव देखील माहीत नाही, त्याला अिंग्रजांपाशी 'म्यक्झिम' बंदुका व लढाअु जहाजे आहेत हे अैकताच भयग्रस्तता प्राप्त व्हावी यामध्ये काहीअेक नवल नाही. पण अिंग्लंडच्या ताब्यात असलेले साम्राज्य किती अवाढव्य आहे, याचा विचार केला तर त्यांची शक्ती किती अल्प आहे हे आपल्यास समजून येअील. जर जर्मनीने अिंग्लंडवर स्वारी केली तर खुद्द अिंग्लंडचे संरक्षणाचीही भ्रांती पडणार आहे ! मग आयर्लंड, अिजिप्त, झुलुलँड यांच्या संरक्षणाचे नावच नको व तो हिंदुस्थान देश ! तीस कोटी लोकांनी गजबजलेला, हिमालयादि पर्वतांनी व समुद्र देवतांनी संरक्षिलेला, शिवाजी, प्रतापसिंह, गुरू गोविंदसिंह यांच्या पितृस्थानी असलेला, असा तो हिंदुस्थान देश अनंतकाल ताब्यात ठेवण्याची व्यवस्था कशी करावयाची? हिंदू लोकांची राजनिष्ठा ती व्यवस्था करीत आहे तोपर्यंत ठीक आहे. पण हिंदू लोकांची देशनिष्ठा उत्पन्न झाली तर पुढे काय करावे याचा विचार अिंग्रजांनी

केलाच पाहिजे व याचा विचार करू लागताच ते गोंधळून जातात. हिंदुस्थान देशनिष्ठ झाल्यावर मि. सिली हे आपल्या पुस्तकात म्हणतात, की मग अेक दिवसभर देखील हिंदुस्थानात राहण्याची सोय नाही. अिंग्लडचे भिकारडे आरमार हिंदुस्थानला काय ताब्यात ठेवणार ! अिंग्लंड साम्राज्य सांभाळण्यास किती असमर्थ आहे हे धूर्त अिंग्रजांनी केव्हाच ताडले आहे. आपले साम्राज्य बुडणार हे त्यांना पूर्णपणे कळले आहे. आता त्यांचे सर्व प्रयत्न फक्त अशाचसाठी आहेत की, जितकी जास्त चिकाटी टिकविता येअील तितकी टिकवावी. परिणामाचा प्रश्न नसून दिरंगाअीचा प्रश्न आहे. कारण अिंग्रज लोक आपल्या अिकडे वाटतात तितके काही सशक्त नाहीत. आपल्या तिकडे निवडलेले सुदृढ लोक येतात व वाटेल तितके वाढतात, परंतु खुद्द त्यांचे देशात पाहावे तो आपल्या सामान्य मनुष्यात व त्यांच्या सामान्य मनुष्यात काही भीतिदायक भेद नाही, काही वर्षापूर्वी राज्यारोहणानिमित्त हिंदी शिपाअी इकडे आले होते. नेपाळी, शीख व मराठा शिपाई काटकपणात व धाडसात अिंग्रजी शिपायापेक्षा काकणभर जास्तच आहेत. स्वदेशाभिमानात ते कमती आहेत व म्हणूनच अिंग्रजी अंमलाखाली राबत आहेत. अिंग्रजांची शारीरिक अवनती झपाट्याने होत आहे. गेल्या पंचवीस वर्षात सैन्याला अुपयोगी म्हणून अुंची व वजन ठरविलेले होते तितके आता शेकडा दहात आढळत नसल्याने ती अट कमी करण्यात आली आहे. शिपायाचा धंदा सोडून अिंग्रजी तरुण दुकानाकडे धावत जातो. म्हणून लॉर्ड रॉबर्टस् रागे भरत आहेत व त्यांनी या अिंग्रजी शरीरक्षयाला भिऊन 'रायफल क्लब' ची स्थापना करण्याची खटपट जारीने चालविली आहे. बहुतेक पत्रातून या विषयाची चर्चा सुरू झालेली आहे व जो तो आपापल्या परीने अिंग्रजांची अशक्तता दूर करण्यास काय युक्ती योजावी ह्या विचारात आहे. अिंग्लिश लोक आता अगदी घाबरले आहेत. त्यातूनही आयर्लंडची चळवळ, अिजिप्तमधील चळवळ, हिंदुस्थानातील चळवळ, जर्मनीची तुर्कस्थानातील चळवळ वगैरे चळवळींनी लंडनच्या उरात धडकी भरली आहे. ज्या आरमाराला व सैन्याला पाहताच आपण हिंदू लोक गर्भगळीत होतो त्या आरमाराची व सैन्याची खरी योग्यता अिंग्लंडच्या पूर्ण ध्यानात आलेली आहे. जर आयर्लंडने व हिंदुस्थानने आपापले लोक परत बोलावले तर अिंग्लंडचे सैन्य किती उरणार? ते अिंग्लंडच्या निम्म्या भागाचे रक्षणास देखील पुरणार नाही ! अशा भीतीने कंपित होऊन हल्ली अिंग्लडमध्ये



दैनिक पत्रातून वरील आशयाच्या चर्चा चाललेल्या आहेत. पैकी अुदाहरणार्थ अेका पत्राची हकीगत खाली देतो.

'डेली मिरर' या नावाचे अेक दैनिक पत्र लंडनमध्ये प्रसिद्ध होत असते. ह्या पत्राच्या लाखो प्रती दररोज खपत आहेत. हे पत्र लहान मुलांत फारच प्रिय असल्याने त्या मुलांसाठी लष्करी शिक्षणाच्या आवश्यकतेनुसार या पत्रात लेखमाला सुरू झाल्या आहेत. अिंग्रजी तरुणाची शरीरप्रकृती दिवसेंदिवस किती विलयला जात आहे याचे पूर्ण दिग्दर्शन करून हिंदुस्थानातील स्वदेशी चळवळ, अिजिप्तमधील गडबड वगैरे चिन्हांवरून अिंग्रजांचे दुसऱ्याचे कुरणावर चरण्याचे व दुसऱ्यांच्या पायावर अुभे राहण्याचे दिवस संपत आले असून आता स्वत:चे सामर्थ्य निदान अिंग्लंडच्या संरक्षणापुरते तरी वाढवावे असा अुपदेश देण्यात आला. स्वयंसेवकांचे सैन्य तयार केल्याशिवाय अिंग्लंडची धडगत नाही, ही गोष्ट लॉर्ड राबर्टस्‌पासून तो वर्तमानपत्रांच्या चालकांपर्यंत सर्वांच्या ध्यानात आता आली आहे. सक्तीचे लष्करी शिक्षण द्यावे असे अेका पक्षाचे म्हणणे आहे व दुसऱ्याचे म्हणणे की लष्करी शिक्षणाची महत्त्वाची अंगे अितकी लोकप्रिय करून सोडावी की, लोकांनी आपण होअुनच लष्करी शिक्षण घ्यावे. ही स्थिती घडवून आणण्यास मुख्य अुपाय म्हणजे तरुणपणीच विद्यार्थ्यांस शारीरिक शिक्षणाची गोडी लावणे. 'डेली मिरर' मध्ये एक लष्करी ऑफिसर म्हणतो की, लहानपणी विद्यार्थ्यास जर व्यायामाची गोडी लावली तर तो जन्मभर व्यायाम सुरू ठेवल्याशिवाय राहणार नाही. तेच अेखाद्या बावीस वर्षाच्या तरुणाला व्यायामाचा नाद लावू म्हटले तर ते अतिशय कठीण होते असा अनुभव आहे. शिवाय लहानपणी तोलेल अितका व्यायाम करीत गेले तरी शरीराला वळण ताबडतोब लागते व अंगातील रग वाढत जाते. परंतु अेकदा हाडे व स्नायू कठीण झाले म्हणजे मग त्यांना वळण लावणे अशक्य होअुन जाते. म्हणून लहान मुलांना १४ वर्षापासून तालीम शिकविलीच पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु तालीम करून नुसते लठ्ठ होण्यात खरी शक्ती नसते. हल्लीच्या काळी स्वदेशरक्षणाला नुसत्या तालमीहून अधिक शिक्षण पाहिजे आहे व ते शिक्षणही तरुणपणीच देअु लागावे असे येथे सर्वांनुमते ठरत आले. हे व ते शिक्षण तालमीबरोबर दिले गेले म्हणजे लष्करी शिक्षण स्वयंसेवक शिपाया पुरते मिळणारे आहे. आपल्याकडे लष्करी शिक्षणाबद्दल लोकांची फार विलक्षण समजूत झालेली आहे. लष्करी शिक्षण म्हणजे अेक मोठे भानगडीचे, धोक्याचे व